भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे

भारती विदयापीठ पो स्टे पुणे
दिनांक-०८/०८/२०१९.

प्रेसनोट

**आंबेगाव बुा येथील शहिद कर्नल पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेली सराईत गुन्हेगाराची टोळी घातक हत्यारासह जेरबंद**

दिनांक.०७/०८/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस ठाणेचे तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड, व त्याचा स्टाफ असे पोलीस ठाणे हददीत रात्रगस्त दरम्यान पेट्रोंलीग करीत असताना तपास पथकाचे कर्मचारी **सर्फराज देशमुख व राहुल तांबे** यांना त्याच्या खास बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, रेकार्ड वरिल कुविख्यात गुन्हेगार तौसिफ सय्यद व त्याच्या बरोबर चार ते पाच साथीदार असुन ते सर्व गंभीर गुन्हयातील रेकार्ड वरिल गुन्हेगार आहेत व ते सर्व जण धारदार हत्यारे घेवुन धबाडी आंबेगाव येथील उत्कर्ष शाळेच्या जवळील स्वरा बिल्डींगच्या जवळ भिंतीच्या आडोश्याला थांबलेले असुन ते आंबेगाव बुा येथील शहिद कर्नल प्रकाश पाटील पेट्रोल पंपावर दरोडा टाकणेचे तयारीत आहेत. अशी माहिती मिळाल्याने सदर माहिती लागलीच तपास पथकाचे अधिकारी सुबराव लाड यांना कळविली. त्यांनी सदरची माहीती श्री विष्णु ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांना कळविली असता त्यांनी जास्तीत जास्त पोलीस स्टाफ बरोबर घेवुन जावुन ताबडतोब कारवाई करण्याबाबत आदेश दिल्याने मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन दरोडयाच्या तयारीत असलेल्या इसमाना धारदार हत्यारासह शिताफिने पकडुन त्यानी त्याची नावे १)तौसिफ उर्फ मोसिन जमीर सय्यद, वय २४ वर्षे ,रा संतोषनगर कात्रज पुणे २) चंद्रशेखर उर्फ शेखर विठोबा ठोंबरे, वय २२ वर्षे, रा. संतोषनगर, कात्रज पुणे मुळ रा. सोलापुर, अक्कलकोट, मल्लीकार्जुन नगर ३) रविंद्र दत्ता सुर्यवंशी, वय २२ वर्षे, रा.जाधवनगर, गल्ली नं.०४, वडगाव बुा पुणे ४) रफिक मदार शेख, वय २१ वर्षे, रा. सदाशिव दांगटनगर, धबाडी आंबेगाव बुा पुणे ५) विकास सुभाश सावंत, वय २३ वर्षे, रा जाधवगनर, आर के जीमच्या शेजारी वडगाव पुणे मुळ रा. सांवतवाडी, ता.केज, जि. बीड असे असल्याचे सांगितले. सदर आरोपीची त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या अंझडतीत ३ लोखंडी धारदार कोयते, मिरची पुड, शहिद कर्नल प्रकाश पाटील पेट्रोल पंपाचा नकाशा असे साहित्य मिळुन आले. त्यांचेकडे अधिक संखोल चौकशी करता त्यांनी ते सर्वजण शहिद कर्नल प्रकाश पाटील पंप लुटण्यासाठी आलो असल्याची कबुली दिली. त्याच्याकडुन दरोडा टाकण्यासाठी लागनारे एकुण १५,७१०/- रु असा सामान जप्त करण्यात आले.

वरिल आरोपी पैकी **तौसिफ उर्फ मोसिन जमीर सय्यद** हा रेकार्ड वरिल गुन्हेगार असुन त्याच्यावर यापुर्वी मार्केड यार्ड येथे पेट्रोल पंपाची ३५ लाख रु रोख रक्कम दरोडा टाकुन लुटल्याचा, जबरी चोरीचा तसेच मागिल पंधरा दिवसापुर्वी खंडणीच्या स्वरुपात प्लॅटची मागणी केल्याच्या गुन्हयामध्ये मुख्य आरोपी असुन तो गुन्हा केल्यापासुन पोलीसांना गुंगारा देत होता. त्याच्यावर यापुर्वी तीन खुनाचे प्रयत्न,जातीय दंगली,दरोडा, जबरी चोरी गुन्हे दाखल आहे. परंतु सदर गुन्हयातुन तो जामीनावर सुटला असुन गुन्हयाच्या कोर्ट कामकाजसाठी तो हजर राहत नसल्याने त्याच्यावर मा. न्यायालयाने नॉन बेलेबल वॉरट ही काढलेली आहेत.

तसेच आरोपी **चंद्रशेखर उर्फ शेखर विठोबा ठोंबरे, रविंद्र दत्ता सुर्यवंशी, रफिक मदार शेख** यांनी मागिलच आठवडयात कात्रज चौकात तलवारीने रिक्षाच्या काचा फोडुन दहशद निर्माण केली होती. त्याबाबत भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे येथे त्याच्यावर गुन्हा दाखल आहे. गुन्हा केल्यापासुन तेही पोलीसांना गुंगारा देत होते. वरिल आरोपी चंद्रशेखर उर्फ शेखर विठोबा ठोंबरे याने व त्याच्या साथीदारांने शिरवळ येथे पत्रकाराला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे, तेव्हा पासुन तो फरार होता. त्याच्यावर सहकारनगर, भारती विदया. खुनाचा प्रयत्न, मारामारीचे गुन्हे दाखल आहेत. तसेच रफिक शेख हा सिंहगड पोलीस ठाणे रेकार्ड वरिल गुन्हेगार आहे.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पुर्वे प्रादेशिक विभाग श्री श्रींकात तरवडे, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री शिरीष सरदेशपांडे सो, सहा. पोलीस आयुक्त श्री मालोजीराव पाटील सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे पोलीस निरीक्षक (गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुबराव लाड पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, सर्फराज देशमुख, राहुल तांबे, सचिन पवार, कुंदन शिदे, गणेश चिचंकर, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, अभिजीत जाधव, योगेश सुळ यांनी केलेली आहे.